पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर
खारकर आळी, कळवा ब्रीज जवळ, ठाणे पश्चिम-४००६०१
ई-मेल- cp.thane.sheetbr@mahapolice.gov.in

क्र. .ठाआ/आस्था-२(७)/भरती कक्ष-अनुकंपा/ २६४९ / २०२६, ठाणे, दि. २१/०९/२०२६

**विषय** :- अनुकंपा प्रतिक्षायादीवरील उमेदवारांनो नियुक्ती आदेश स्विकारण्यासाठी उपस्थित राहण्याबाबत.

-----ooooo-----

वरील विषयान्वये कळविण्यात येते की, या घटकाच्या आस्थापनेवरील अनुकंपा प्रतिक्षायादीवरील खालील नमुद उमेदवार हे शारिरीक मोजमाप चाचणी, वैदयकिय तपासणी व चारित्र पडताळणी मध्ये पात्र ठरले आहेत. त्यामुळे त्यांना पोलीस शिपाई पदाचे नियुक्ती आदेश दयावयाचे आहेत.

१. श्री.पुर्वल विजय जाधव - मो.क्र.९७६९६७५६५४

तरी प्रभारी अधिकारी, सोशल मिडीया यांनी सोबतच्या सुचना क्र.१० आपल्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात याव्यात. तसेच प्रभारी अधिकारी, बिनतारी संदेश विभाग यांनी नमुद उमेदवाराच्या नावासमोर दर्शविलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस द्वारे नियुक्ती आदेश स्विकारण्यासाठी उपस्थित राहण्याबाबतच्या सुचना देण्यात याव्यात.

(मा.अपर पोलीस आयुक्त, (प्रशासन)
यांच्या मान्यतेने)

२१/९

**(मिना मकवाणा)**
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-१)
पोलीस आयुक्त, ठाणे यांचे कार्यालय

**प्रति,**

प्रभारी अधिकारी, सोशल मिडीया कक्ष, ठाणे
सपोआ. बिनतारी संदेश विभाग, ठाणे

**प्रत,**

राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय ठाणे

२/- वरील नमुद उमेदवारास दि.२३/०९/२०२६ रोजी नियुक्ती आदेश स्विकारण्याकरीता बोलविण्यात आले आहे. त्यामुळे वरील नमुद उमेदवार मुख्यालयात हजर होण्यासाठी आल्यास त्या उमेदवारांची स्टेशन डायरी करुन त्यांना या कार्यालयात घेवून येण्याकरीता एका जबाबदार कवायत निर्देशकाची निवड करुन त्यांना या कार्यालयात पाठवावे.

विशेष शाखा, ठाणे
५४७५
२३।९।२६
सो. मिडिया कक्ष.

महाराष्ट्र पोलीस

ठाणे शहर

सुचना क्र.- १० दिनांक : २१/०९/२०२६

# पोलीस आयुक्त, कार्यालय, ठाणे शहर.
# पोलीस शिपाई भरती सन २०२४-२५.

**-: दि.२३/०९/२०२६ रोजी नियुक्ती आदेश स्विकारण्यासाठी येणाऱ्या उमेदवारांसाठी सुचना :-**

**विषय** :- ठाणे शहर पोलीस शिपाई भरती २०२४-२५

-----ooooo-----

पोलीस आयुक्त, ठाणे शहर कार्यालयाच्या आस्थापनेवरील अनुकंपा पोलीस शिपाई प्रतिक्षायादीवर असलेले खालील नमुद उमेदवार **(०१ - पुरुष)** हे शारिरीक मोजमाप चाचणी, वैदयकिय तपासणी व चारित्र्य पडताळणी मध्ये पात्र ठरले आहेत. त्यामुळे खालील नमुद उमेदवाराला भरती निकषाच्या अधिन राहून व आवश्यक त्या प्रशासकिय बाबी विचारात घेवून नियुक्ती आदेश स्विकारण्यासाठी बोलाविण्यात येत आहे.

**तरी शारिरीक मोजमाप चाचणी, वैद्यकिय व चारित्र पडताळणीत पात्र ठरलेल्या खालील नमूद उमेदवार यांनी दि.२३/०९/२०२६ रोजी सकाळी ०७.०० वाजता ठाणे शहर पोलीस मुख्यालय, खारकर आळी, कळवा ब्रीज जवळ, ठाणे (पश्चिम) ४०० ६०१ येथे न चुकता हजर रहावे.**

| पोलीस शिपाई | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | चेस्ट क्र. | उमेदवाराचे नाव | मुळ प्रवर्ग | निवड प्रवर्ग | निवड समांतर आरक्षण |
| १ | अनुकंपा | पुर्वल विजय जाधव | अ.जा. | अ.जा. | --- |

नियुक्ती आदेश स्विकारण्याकरिता बोलाविण्यात आलेल्या वरील नमुद उमेदवारांनी नियुक्तीचा अधिकार प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये. भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर निवड रद्द करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यास आहेत याची संबंधित उमेदवाराने नोंद घ्यावी.

तसेच खाली नमूद केलेल्या सुचनांचे पालन करण्यात यावे.

➢ **नियुक्तीसाठी येताना खालील नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे न चुकता सोबत आणणे आवश्यक आहेत :-**

१. ०४ पासपोर्ट साईज फोटो
२. आधारकार्ड व पॅन कार्ड
३. दैनंदिन गरजेच्या वस्तू घेवून पोलीस प्रशिक्षणाच्या तयारीने न चुकता हजर रहावे.

तसेच सोबत नियमित वापरण्यास लागणारे कपडे, विश्रांतीकरिता साहित्य (दरी, मच्छरदाणी, पांघरुण), ताट-वाटी, तांब्या, ग्लास, दाढीचे साहित्य (पुरुषांकरिता), २ खाकी हाफ पॅन्ट, २ पांढऱ्या बनियान, कॅनव्हास शुज (१ जोडी), खाकी नायलॉन सॉक्स (२ जोडी), २०० पानी वहया (२), १ पेन, १ बकेट, महिलांकरिता २ टाऊझर, २ पांढरे टी शर्ट इत्यादी आवश्यक साहित्य सोबत आणावेत. सोबत मेस ॲडव्हांस रु.२०००/- घेवून यावे तसेच संपर्कासाठी आवेदन अर्जात नमुद केलेला मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी अद्यावत ठेवावा. उमेदवाराने आपले सोबत मौल्यवान चैनीच्या वस्तू किंवा किंमती वस्तू उदा.सोन्याचे दागिने इ.वस्तू आणू नयेत अशा वस्तू हरविल्यास किंवा चोरीला गेल्यास कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

➢ **विशेष सुचना:-**

१. नियुक्तीसाठी दिलेल्या दिनांकाच्या / वेळेस गैरहजर राहील्यास पुर्व सुचना न देता निवड रद्द करण्याबाबतची पुढील कारवाई करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी व न चुकता हजर राहावे. सदरची पोलीस शिपाई पदाची अस्थायी नियुक्ती ही नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीच्या अधीन आहे. व सदरहू अटी व शर्ती उमेदवारांस बंधनकारक आहेत.
२. लेखी परिक्षा व मैदानी चाचणीस हजर असलेल्या उमेदवारांऐवजी इतर बोगस उमेदवार नियुक्तीसाठी हजर राहिल्यास त्यांचे विरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

मा. अपर पोलीस आयुक्त (प्रशासन) यांच्या मान्यतेने

पोलीस आयुक्त, ठाणे — पोलीस भरती सन २०२४-२५

२१/९

**(मिना मकवाणा)**
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-१)
पोलीस आयुक्त, ठाणे यांचे कार्यालय